
ISSN 2395-5937

# २१ व्या शतकात गांधीविचारांची प्रस्तुतता



**मुख्य संपादक**
प्राचार्य, डॉ. पंजाब चव्हाण

**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. विजय हट्टेकर
प्रा. मुकुंद येगावकर

**साहित्यक्षुधा**
**विशेषांक-२०१७,**
प्रकाशक - संजीवकुमार पांचाळ

Scanned by CamScanner

| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|---|
| २१. | महात्मा गांधीचे महिला सबलीकरणाविषयी विचार | डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | ९२ |
| २२. | म. गांधीजीचे धर्मनिरपेक्ष राजकारण व वर्तमान स्थिती | डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे | ९५ |
| २३. | गांधीजींचा शोधबोध | गिरी निरंजनगिर गोविंदगिर | १०१ |
| २४. | महात्मा गांधीच्या ग्राम स्वराज्य विषयक विचारांची प्रासंगीकता | ममता मधुकरराव देशमुख | १०६ |
| २५. | महात्मा गांधी : स्त्री अस्मिता आणि सद्यस्थिती | कु. महिपाल पुष्पा विश्वनाथराव | १०९ |
| २६. | म. गांधींच्या विचारांची २१ व्या शतकात प्रस्तुतता | मेहत्रे दत्ताजी हुलप्पा | ११२ |
| २७. | एकविसाव्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचाराची प्रासंगिकता | मुसळे अविनाश गंगाधर<br>डॉ. सौ. कल्पना कदम | ११४ |
| २८. | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची प्रासंगीकता | मेघा शरदचंद्र पाठक | ११७ |
| २९. | आजच्या काळात गांधीजीच्या मुल्यविषयक विचारांची प्रस्तुतता | डॉ.शिवाजी सोमला पवार | ११९ |
| ३०. | गांधीविचारातील अहिंसा आणि दहशतवाद | डॉ. पी. डी. सूर्यवंशी | १२५ |
| ३१. | महात्मा गांधीचे विचार व २१ वे शतक | प्रा. सुर्यकांत माधवराव सांभाळकर | १२८ |
| ३२. | २१ व्या शतकात गांधी विचारांची प्रासंगीकता | प्रा. राठोड डी. बी. | १३१ |
| ३३. | स्वतंत्र भारत में अनुसूचित जातियों का उत्थान : डॉ.बाबासाहेब अम्बेडकर - म.गांधी के दृष्टिकोन | प्रा.रामचंद्र गायकवाड | १३३ |
| ३४. | २१ व्या शतकात 'गांधीवादा'ची प्रासंगिकता | प्रा.डॉ. शिंदे आर.डी. | १४५ |
| ३५. | एकविसाव्या शतकातील भारताच्या विकासासाठी गांधीवादी विचारांची आवश्यकता | प्रा.डी.के. मगर | १५१ |
| ३६. | महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना : एक अवलोकन | प्रा.सकनुरे सूर्यकांत लक्ष्मण | १५५ |
| ३७. | महात्मा गांधी तत्त्वज्ञान आणि भारतीय लोकशाही | प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | १५७ |
| ३८. | महात्मा गांधींचे विचार आणि २१ वे शतक | श्री डॉ.डोंगरे एल.बी. | १६१ |
| ३९. | महात्मा गांधीजी व ग्रामीण विकास: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.लांडगे पंडित शिवराम | १६४ |
| ४०. | २१ व्या शतकात गांधी विचाराची प्रस्तुतता | प्रा.डॉ.मीरा विठ्ठलराव फड | १६७ |
| ४१. | एकविसाव्या शतकातील मानवतेचा दिपस्तंभ महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान | प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार | १६९ |
| ४२. | म.गांधीची स्वराज संकल्पना व सद्यस्थिती | प्रा.डॉ.डी.एम. कुंचेलवाड | १७१ |
| | [illegible] | [illegible] | १७४ |


Scanned by CamScanner

# महात्मा गांधीचे महिला सबलीकरणाविषयी विचार

- डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय, देगलूर,
मो. ९४२३४३९२७६

**प्रस्तावना :**

भारतात इ.स.पूर्वकाळापासून ते २१ व्या शतकापर्यंत महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर क्षेत्रात समान सुधारणा झाल्या. भारतीय महिलांनी या देशाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनाच्या जडणघडणीत पुरुषासमान योगदान दिले. वर्तमानात माहिती तंत्रज्ञान, डिजिटल समाज व नागरिक याबाबत चर्चा सुरु आहे. तर दूसऱ्या बाजूने महिला या सर्वांपासून कशा दूर राहतील असा विचार करणारा एक वर्ग आहे. भारतीय लोकशाही सक्षमीकरण महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. महिला सक्षमीकरणाची संकल्पना स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही यशस्वी होत नाही हे भारतीय लोकशाहीचे अपयश आहे. कारण स्वातंत्र्यानंतर महिला सक्षमीकरणाबाबत भारतीय समाजसुधारक व संविधानाने जे चिंतन व उपाय सांगितले त्याकडे जाणीवपूर्वक झालेले दुर्लक्ष होय.

प्रस्तुत लेखात महिला सबलीकरणाच्या महत्वासह महात्मा गांधींनी महिला सबलीकरणाविषयी काय विचार मांडले? व कोणते कार्य केले ? याचा आढावा घेतला आहे. तो घेताना विषयाची मांडणी महात्मा गांधीच्या इतर विषयाकडे जाणार नाही याकडे लक्ष दिले, परंतु महिला सबलीकरणाबाबत गांधीच्या तत्वज्ञानातील प्रत्येक विषयाला स्पर्श केला आहे. यासाठी ऐतिहासिक, विश्लेषण व ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा आधार घेतला आहे.

महिला सबलीकरण आणि लोकशाही परस्परपूरक आहेत. कोणताही समाज व राष्ट्राच्या यशस्वितेची महिला सबलीकरण ही संजीवनी बुटी आहे. देश व समाजातील विविध रोगांवर तो एक रामबाण उपाय आहे. महिला सबलीकरण अच्छे दिनचा एक मार्ग आहे. राष्ट्रातील सर्व जनतेचा समान व शाश्वत विकास घडवण्यासाठी महिला सबलीकरणाची प्रक्रिया अलीकडील सर्व राष्ट्रात कमी अधिक प्रमाणात राबवली जाते, परंतु कांही मुस्लिम राष्ट्र यास अपवाद आहे. भारतात मागील ७० वर्षांपासून महिला सबलीकरणाबाबत अनेक प्रयत्न करण्यात आले. तरीही या देशातील सर्वांत अधिक उपेक्षित वर्ग म्हणून महिलांचा उल्लेख केला जातो. महिला सबलीकरणाबाबत महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतील जीवनापासूनच विचार करतात, परंतु वर्तमानातील भारतीय सामाजिक मानसशास्त्राला मुलगा आणि मुलगी अशा फरक करत आहे. गांधीच्या मते



Scanned by CamScanner

Reg. No. MAHMAR45690 ISSN 2395-5937

आमच्या समाजात सर्वात अधिक दुःखी व शोषित कोण असेल तर ती स्त्री आहे. त्यामुळे आमचे सामाजिक व इतर क्षेत्रात अधःपतन झाले. स्त्री आणि पुरुषातील नैसर्गिक फरकाला संपूर्ण जगाने पाहिले आहे. त्याशिवाय या दोघात दुसरा कोणताही फरक नाही. महात्मा गांधीनी स्त्रियांना भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासोबत जोडले. आपल्या आश्रमात समान हक्क व स्वातंत्र्य देवून समाजापुढे स्त्रियांचा दर्जा कसा असावा याचे एक उदाहरण मांडले. महिलांना घरी आणि समाजात आत्मविश्वास व उत्साहपूर्वक जीवन जगवण्यास पोषक वातावरण निर्माण करावे. यामुळे स्त्री आणि पुरुष सहजीवनाचा आनंद घेवु शकतात. मानव म्हणून जर स्त्रीचे मूल्य व महत्व प्रस्थापित झाले नाही तर तिचे जीवन शक्य नाही. समाजातील स्त्रिचे अस्तित्व समजून घेण्याबाबत समाजात अहंकारी व अज्ञानी प्रवृत्ती अधिक जाणवते. असा नकारात्मक भाव पुरुषासह स्त्रियांच्याही मनात आहे. स्त्रियांचे कर्तव्य त्यांचे योगदान, समता आणि विषमता या सर्वांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. देशात अनेक जाती व धर्म आहेत. त्या प्रत्येकाच्या वेगवेगळ्या रीतिरिवाज आहेत, परंतु कोणत्याही समाजात स्त्रीयांचे जीवन दुःखी, त्रासथदाक व अपमानास्पदच आहे. या अपमानास्पद जीवनातून स्त्रिचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न गांधीनी केला.

भारताच्या सामाजिक व राजकीय जीवनात चिंतेचे अनेक विषय आहेत. त्यापैकी एक महिला सबलीकरण होय. महिलांच्या स्थितीत सुधारणा कशा कराव्यात याबाबत बुध्दिजीवी, शास्त्रज्ञ, समाजसुधारक, राजकारणी व सामाजिक चळवळीतील कार्य चिंताकरुन चिंतन करत आहेत, परंतु महिला सबलीकरण या विषयाचीच व्याप्ती अति विशाल आहे. त्यामुळे यात कोणत्या विषयाला घ्यावे व कोणत्या घेवू नयेत हा वादाचा प्रश्न आहे. युरोपीयनदृष्ट्या याकडे प्रतिष्ठा व आर्थिकदृष्टीने मांडणी केली जाते. महिलांवरील जबाबदारी ती जसे जसे मोठे होते तसतसे वाढत जाते. महिला सबलीकरणाच्या विषयात महिलांच्या माणुस म्हणून सन्मान व दर्जा मिळवण्याशी संबंधित असणारे सर्व विषय येतात. महिला सबलीकरणाबाबत स्त्रीवाद्यांनी चिंतन केले. व्यक्तीने आपल्या हिताप्रति जागरुक असावे. कशा प्रकारे आपल्या हिताला दुसऱ्या हिताशी जोडता येईल. जेणेकरुन निर्णय निर्धारणाची प्रक्रिया आपल्या आणि इतरांच्या ज्ञानावर आधारित असेल. ज्यामुळे दुसऱ्यावर प्रभाव टाकण्याच्या क्षमतेचे आकलन होईल. स्त्रीवाद्यांच्या मते सबलीकरण म्हणजे तिचे अधिकार ज्याच्या साह्याने विरोध व सौदेबाजी आणि बदल घडवता येईल. आपल्या सक्रियतेसाठी आणि इतरावंर प्रभाव टाकण्याची क्षमता मिळविण्यासाठी सबलीकरणाची आवश्यकता आहे. यामुळे शोषण करणारे धोरण व त्याचे संचलन करण्याच्या पध्दती समजुन घेता येतात. कोणतीही क्षमता व सत्ता ही स्वत: आपल्यामध्ये असणे गरजेचे आहे. अशाप्रकारे सबलीकरण एक प्रक्रिया आहे. तो विकासाचा एक मार्ग आहे, पर्याय नाही. जेंव्हा विकासाबाबत चर्चा होते तेंव्हा ती सर्वच सजीवांबाबत व्हावी तिला लिंगभेदाचा स्पर्श नसावा. महिलांचा विकास महत्वपूर्ण भाग आहे. कारण महिला विकासाचे एक महत्वपूर्ण अंग आहे. कोणत्याही देशात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौध्दिक व नैतिक विकासात महिलांची भूमिका महत्वपूर्ण असते. गांधींना याची पूर्णत: जाणीव होती. त्यासाठी गांधी म्हणत की, विकासाच्या प्रक्रियेत स्त्रियांना सहभागी करुन घ्यावे. अन्यथा विकास अपूर्ण होईल. स्त्रियांच्या अधिकाराबाबत गांधीनी कोणतीही तडजोड केली नाही. गांधीच्यामते स्त्री आणि पुरुषांना एका समान कायद्यात बंदिस्त करावे. मुलगा आणि मुलगी असा भेद नसावा त्यांच्यासोबत पूर्णपणे समतेचा व्यवहार करावा. या विचारांना गांधींनी सिध्दांताच्या संकल्पनेत मांडले नाही, परंतु आपल्या जीवनात त्याचे अनुकरण केले.

महात्मा गांधीनी आपल्या आश्रमातील महिलांसोबत समता व सन्मानपूर्वक व्यवहार केला. महिला भगिनी समाजाला सहकार्य केले. पुरुषांच्या कोणत्याही कार्यक्षेत्राला महिला काबीज करु शकतात. म्हणून गांधीनी महिलांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचा अधिकार दिला. गांधीकाळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात फार कमी महिलांनी राजकारणात आपली ओळख बनवली होती. गांधीच्या मते महिलांना मतदानाचा अधिकार असावा त्यांना कायद्यानुार समान दर्जा मिळावा महिलांचे राजकारणात जे योगदान आहे त्याचे श्रेय गांधीनांच द्यावे लागेल. महिला सबलीकरण ही मानसिक



Scanned by CamScanner

प्रक्रिया नाही तर लोकशाही व्यवस्थेला सुदृढ करणे आणि अन्याय व शोषणाच्या विरुध्द संघर्ष करण्याची पूर्व अट आहे. गांधीच्या स्वप्नातील अधिकार, समान संधी, समान सहभागीत्व असणाऱ्या न्यायपूर्ण व समतेच्या जगातील सत्यता पूर्ण करण्याचे एक पाऊल म्हणजे महिला सबलीकरण आहे. कारण जेंव्हा एका महिलेचा विकास होतो तेंव्हा तिचे कुटूंब व समाजाचाही विकास होतो. कारण कुटूंब समाजाच्या विकास दिशेवरच प्रदेश, देश व परदेशातील फायदे मिळतात. त्यामुळे जोपर्यंत महिलांचे संघटन होणार नाही तोपर्यंत मानवतेच्या विशाल वर्गाबाबतचा महत्मा गांधींच्या संघर्षास अंतिम रुप मिळणार नाही. शिक्षणासाठी संपूर्ण जगात एक सक्रिय अभियान चालवण्याची गरज आहे. कारण जगातील एक मोठा भाग शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित आहे. शिक्षणाबाबत गांधीचे विचार स्पष्ट होते. शिक्षणाबाबत जेवढी सुविधा व मान्यता पुरुष मिळतात तेवढीच स्त्रियांना मिळावी. जेथे स्त्रि शिक्षणासाठी विशेष सुविधा देण्याची आवश्यकता असेल तेथे त्या द्याव्यात.

लोकशाहीत सत्य व अहिंसेवर आधारित विश्वासाची निर्मिती करताना जेवढे अधिकार पुरुषाला आपले भविष्याची निर्मिती करण्यासाठी आहेत तेवढेच अधिकार स्त्रीलाही द्यावेत. कारण अहिंसक व समतावादी समाज स्त्री व पुरुष दोघांच्या कर्तव्य व अधिकारासाठी योग्य आहे. आदर्श जागतिक व्यवस्थेत सामाजिक वर्तनाचे नियम स्त्री आणि पुरुष दोघांनी परस्परांत चर्चा करुन ठरवावेत. गांधींच्या स्वप्नातील व हिंद स्वराज्यातील अभिप्रेत समाजात स्त्री पुरुषाची सहचारिणी आहे. जिची बौध्दिक क्षमता पुरुषांच्या बौध्दिक क्षमतेप्रमाणेच आहे. पुरुषांप्रमाणेच प्रत्येक क्षेत्रात व विषयात भाग घेण्याचा अधिकार तिला आहे. स्वातंत्र्याचा मग ते कोणतेही असो त्याची गरज तिला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) मूल्यव्यवस्था : गांधीविचार - संपादक डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन्न, नांदेड.

२) Relevance of Gandhian Thoughts Editor, Dr.Vasant Sanap,

३) Be the change you want to see in the world Mahatma Gandhi, Editor Dr.Prashant R.Kadave-2016-January.

४) गांधी, नेहरु, आंबेडकर : सामाजिक न्याय एवं राजननीति, कांता मिना व हेमराज मिन्ना, अदि पब्लिकेशन्न जयपूर-२०११

****

Scanned by CamScanner